स्थापना: १९८० रजि.नं.: केपीआर/जी.एन.एल./१३८

# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६०१२

## Kolhapur District Urban Banks Coop. Association Ltd., Kolhapur

1458 B ward, G.N. Chambers, Kolekar Tikati, Mangalwar Peth, Kolhapur 416012

दूरध्वनी क्र.: (०२३१) २६२७३०७/०८ / Email ID: kopbankasso@gmail.com, Web- kopbankasso.com

जा.क्र.: कोजिनाबँक्सअसो/२०२५-२६/५१ दिनांक : १४ जुलै, २०२५

प्रति,
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
सर्व सदस्य बँका, कोल्हापूर.

**विषय – डेटा विश्लेषण व बँकिंग नियामक अनुपालनासाठी MS-Excel चा वापर यावर प्रशिक्षण कार्यक्रम.**

महोदय / महोदया,

मध्यंतरी शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या अध्यापकांशी चर्चा करत असताना त्यांनी MS-Excel चा वापर त्यांच्या विभागामध्ये किती प्रभावीपणे केला जातो त्याची माहिती दिली. जे सर्वसाधारणपणे कोणाला सहजासहजी समजत नाही. बँकेतल्या कामकाजामध्ये बँक कर्मचाऱ्यांना MS-Excel ची पूर्ण माहिती मिळाली तर बँकांची सांख्यिकी माहिती तयार करणे, विविध उपयुक्त गुणोत्तरे तयार करणे, मॅनेजमेंटला वेगळी वेगळी माहिती देणे, विविध प्रकारचा डेटा उपलब्ध माहितीवरून संकलित करणे सोपे जाणार आहे. त्यामुळे बँकांचा MIS विभाग सक्षम होणार आहे त्यासाठी आपल्या बँकेतील जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना MS-Excel मधील बारकावे शिकवले तर त्याचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

या MS-Excel चा प्रभावीपणे कसा वापर करावयाचा याची संपूर्ण माहिती बँकेच्या अधिकाऱ्यांना व्हावी या उद्देशाने कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने **शनिवार दि. २६ जुलै, २०२५ इ. रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.००** यावेळेत **संख्याशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी** प्रशिक्षण आयोजित केले आहे. तरी याचा सदस्य बँकांनी लाभ घ्यावा.

प्राथमिक चर्चेच्यावेळी काही बँकांनी आपल्या बँकेतील सर्वच कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण द्यावे अशी मागणी केली पण हे प्रशिक्षण प्रात्यक्षिकावर (Practical) आधारित असल्याने एकावेळी फक्तच ५० व्यक्तींना प्रशिक्षण देता येईल. तरी त्याप्रमाणे आपल्या बँकेकडील कर्मचाऱ्यांची नोंदणी करावी.

स्थापना: १९८० रजि.नं.: केपीआर/जी.एन.एल./१३८

**कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि., कोल्हापूर**

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६०१२

**Kolhapur District Urban Banks Coop. Association Ltd., Kolhapur**

1458 B ward, G.N. Chambers, Kolekar Tikati, Mangalwar Peth, Kolhapur 416012

दूरध्वनी क्र.: (०२३१) २६२७३०७/०८ / Email ID: kopbankasso@gmail.com, Web- kopbankasso.com

सदर प्रशिक्षणाचे प्रशिक्षण शुल्क **प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ९००/- + १८% जीएसटी** असे राहील. संगणक लॅब मध्ये ५० संगणक असलेने प्रथम नाव नोंद करणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. नाव नोंदणी करणेची अंतिम तारीख २३ जुलै, २०२५ ही राहील. याची नोंद घ्यावी.

**एनईएफटी / आरटीजीएस साठी तपशिल खालीलप्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| बँकेचे नाव | दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँक लि., | शाखा | **खासबाग** |
| खाते नाव | कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि.,<br>**Kolhapur Zilla Nagari Banks Sahakari Association Ltd.,** | | |
| खाते प्रकार | **चालू खाते / Current Account** | खाते नंबर | **०००८११०१००१३१२** |
| IFSC कोड | **KOLH0000008** | MICR कोड | **416398008** |

(अनिल नागराळे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सोबत प्रशिक्षण कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका जोडली आहे.**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संख्याशास्त्र अधिविभाग आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकारी प्रशिक्षण केंद्र

## कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि.

## व्यवस्थापन विकास कार्यक्रम (MDP)

# डेटा विश्लेषण व बँकिंग नियामक अनुपालनासाठी MS-Excel चा वापर

### कार्यक्रम तपशील

- **दिनांक व वेळ:** २६ जुलै २०२५, सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:००
- **ठिकाण:** संख्याशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **लक्षित गट:** सहकारी बँकांतील व्यवस्थापनामध्ये सहभागी असणारे व्यवस्थापक/अधिकारी

### उद्दिष्ट

या व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचा (MDP) उद्देश सहकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांना Excel चे प्रभावी आणि व्यावहारिक तंत्र शिकवून त्यांच्या डिजिटल कौशल्यांतील दरी भरून काढणे हा आहे. या प्रशिक्षणाद्वारे सहभागी पुढील बाबी आत्मसात करतील:

✓ ग्राहक खात्यांचा डेटा व्यवस्थितरीत्या व्यवस्थापित व विश्लेषित करणे
✓ नियामक अनुपालनासाठी Excel चे योग्य व परिणामकारक उपयोग
✓ व्यवहारांच्या डेटामधून व्यवसायासाठी उपयुक्त माहितीचा वेध घेणे
✓ डेटाची अचूकता वाढवणे, अहवाल सादरीकरणाची गती सुधारणे आणि निर्णय प्रक्रियेत परिणामकारकता आणणे

### कार्यक्रमाचे स्वरूप

✓ **सकाळचे सत्र (सैद्धांतिक व प्रात्यक्षिक आधारावर)**

- Excel च्या मूलभूत गोष्टी: Data management, Formatting, Filters, find and replace, text to columns, formulas, data validation, pivot tables and chart, lookup functions etc.
- नियामक अहवालांसाठी Excel चा वापर: आर्थिक सारांश तयार करणे, ऑटोमेशनची तंत्रे, अचूक व वेळेत अहवाल सादर करणे

✓ **दुपारचे सत्र (हँड्स-ऑन प्रशिक्षण)**

- प्रत्यक्ष बँक डेटावर आधारित सराव
- सर्व सहभागींसाठी नमुना डेटासेट व प्रॅक्टिस फाईल्स प्रदान केल्या जातील.

### सहभागींना काय मिळेल?

✓ Excel वापरण्यात आत्मविश्वास व प्रावीण्य वाढेल
✓ ग्राहक डेटामधून ट्रेंड्स, नमुने व उपयुक्त माहिती सहज मिळवता येईल
✓ प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सैद्धांतिक ज्ञानासह कृतीशील अनुभव
✓ नियामक निकषांनुसार अचूक व सुसंगत अहवाल तयार करता येतील
✓ कार्यक्षमता वाढेल व वेळेची लक्षणीय बचत साधता येईल

### नोंदणी व संपर्क

**संपर्क व्यक्ती:** ........

**मोबाइल:** ........

**ईमेल:** ........

**शुल्क:** प्रति व्यक्ती रुपये: ९००/- + जीएसटी

**नोंदणीची अंतिम तारीख:** २१ जुलै २०२५

**सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल**

### आयोजन समिती

**डॉ. एस. बी. महाडिक,** विभागप्रमुख, संख्याशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. राजन पडवळ,** समन्वयक, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकारी प्रशिक्षण केंद्र

**श्री. अनिल नागराळे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि.

**डॉ. सोमनाथ पवार,** व्यवस्थापन विकास कार्यक्रम समन्वयक, संख्याशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एस. वि. राजगुरू, डॉ. सचिन पाटील,** संख्याशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर